जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तरुण भारत

15 DEC 2023

# विद्यापीठ परिसरात दीक्षांत समारंभाची जय्यत तयारी

## सोमवारी राज्यपालांच्या अध्यक्षतेखाली दीक्षांत समारंभ : मंडप, बुक, खाद्यपदार्थांच्या स्टॉलची उभारणी

प्रतिनिधी

कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचा ६० वा दीक्षांत समारंभ सोमवारी १८ रोजी राज्यपाल तथा कुलपती रमेश बैस यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. ऑल इंडिया कौन्सिल ऑफ टेक्निकल एज्युकेशन (ए.आय.सी.टी.ई.) या राष्ट्रीय नियामक संस्थेचे माजी चेअरमन डॉ. एस. एस. मंथा प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. या पार्श्वभूमीवर राजमाता जिजाऊ साहेब सभागृह, मंडप, ग्रंथ महोत्सवाचे स्टॉल, पदवी प्रमाणपत्र वाटप करण्यासाठीचे स्टॉल उभारले आहेत.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात सोमवारी होणाऱ्या ६० व्या दीक्षांत समारंभासाठी मंडप उभारणी सुरू आहे. (छाया : रियाज ट्रेनर)

केंद्राच्या आदेशानुसार दीक्षांत समारंभाला कुलगुरू, प्र-कुलगुरू, कुलसचिव, परीक्षा संचालक, अधिष्ठाता आणि प्रमुख पाहुण्यांनी पांढरा पायजमा व कुर्ता तर महिलांनी मोती कलरची साडी त्यावर मोरपंखी, जॅकेट परिधान करायचा आहे. या सर्व गोष्टींची संपूर्ण तयारी केली आहे. मंडप उभारला असून परीक्षा भवन परिसरात प्रत्येक शाखेनुसार पदवी प्रमाणपत्र वितरणाचे स्टॉल उभारले आहेत. ग्रंथ व खाद्य पदार्थांचे स्टॉल तयार केले आहेत. प्रशासनाकडून दीक्षांत समारंभासाठी ४० कमिट्या स्थापन करून कामे वाटून दिली आहेत.

### पदवी प्रमाणपत्रांची छपाई अंतिम टप्प्यात

दीक्षांत समारंभात ४९ हजार ४३८ पदवी प्रमाणपत्रे प्रदान करण्यात येणार आहेत. यंदा पदवी ग्रहण करणाऱ्या स्नातकांत २७ हजार ४७५ मुली आहेत. पदवी प्रमाणपत्रांची छपाई अंतिम टप्प्यात आहे.

### शनिवारी ग्रंथमहोत्सव

शिवाजी विद्यापीठाचा ६० वा दीक्षांत समारंभाच्या पार्श्वभूमीवर दोन दिवस अगोदर विद्यापीठातील बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्रोत केंद्राच्यावतीने शनिवारी १६ रोजी सकाळी ७.३० वाजता कमला कॉलेज येथून ग्रंथदिंडीला प्रारंभ होईल. विद्यापीठात ग्रंथदिंडीची सांगता झाल्यानंतर १० वाजता ग्रंथमहोत्सवाचे उद्घाटन होईल. रविवारी १७ रोजी सकाळी ११ वाजता राजमाता जिजाऊ साहेब सभागृहात संगीत व नाट्यशास्त्र विभागाचा 'स्वररंग' कार्यक्रम होणार आहे. ग्रंथ महोत्सवातील स्टॉल १६ ते १८ डिसेंबर पर्यंत रोज सकाळी ९ ते रात्री ९ पर्यंत खरेदीसाठी खुले राहणार आहेत.